# बा. भ. बोरकरांच्या ललितनिबंधलेखनातील चिंतनशीलता



प्रा. सुनिता उम्रस्कर

***देखणे ती जीवने, जी तृप्तीची तीर्थोदके***
***चांदणे ज्यातून वाहे, शुभ्र पाऱ्यासारखे***

असे देखणे जीवन जगणारे, आणि रसिकांना भरभरून आनंद देणारे 'आनंदयात्री' कवी बा. भ. बोरकर. बोरकरांनी रवीद्रनाथ टागोरांना 'आनंदयात्री' ही उपाधी लावली तर पु. ल. देशपांडे यांनी 'आनंदयात्री बाकीबाब' ही उपाधी बोरकरांना लावली. रवीद्रनाथांना ही उपाधी लावण्यामागचे कारण म्हणजे त्यांच्या प्रत्येक उक्तीत आणि कृतीत त्यांना मुख्यत्वे आनंदच जाणवला. बोरकर म्हणतात सारे भूतमात्र आनंदातूनच निर्माण झाले आहे. आनंदामुळेच ते जगते, वाढते आणि शेवटी त्याचा लय होतो, तोही आनंदातच होतो. म्हणूनच ईश्वराला 'सच्चिदानंद' असे म्हणतात. तेराव्या वर्षी बोरकरांना कवितेचा खरा छंद जडला आणि त्या काव्यानंदात ते आयुष्यभर पोहतच राहिले.

बोरकरांनी कवितेबरोबरच कथा, कादंबरी, अनुवाद, ललित लेख असे इतर वाङ्मप्रकारही हाताळले. गोमंतकीय लेखक लक्ष्मणराव सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे 'बोरकरांनी जन्मभर काव्याची आराधना केली; पण त्यामुळे त्यांच्या प्रतिभेला मर्यादा पडल्या नाहीत. साहित्याचे सारे प्रकार त्यांनी यशस्वी रीतीने हाताळून आपल्या निर्माणशक्तीला भरपूर वाव दिला. या साऱ्या प्रकारांत ते सिद्धहस्त ठरले. या सगळ्या साहित्यावर त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला आहे.

ललितनिबंध हा वाङ्मयप्रकार म्हणजे लालित्य व वैचारिकता याचे मिश्रण होय. ललित

निबंध हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यविश्वात आणून सोडण्याचे श्रेय लघुकथाकार ना. सी. फडके यांना दिले जाते. 1926 पासून 'रत्नाकर' मध्ये ते 'गुजगोष्टी' लिहू लागले. त्याच सुमारास वि. स. खांडेकर यांनी मराठीतून स्वैरलेखन केले. 1941 मध्ये फडके यांनी गुजगोष्टीलाच 'ललित निबंध' असे नामाभिधान प्राप्त करून दिले.

ललित निबंध हा लवचिक असा वाङ्मयप्रकार आहे. यात व्यक्तिचित्रे, आठवणी इत्यादींचा समावेश केला जातो. 1928 मध्ये वि. ल. बर्वे यांनी 'पिसारा' या लघुनिबंधसंग्रहाच्याद्वारे लेखन केले. त्यानंतर कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, विजया राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, शांता शेळके, इंदिरा संत, अरुणा ढेरे इत्यादींनी आपल्या संवेदनशील लेखनाला वाट करून दिली. तर बा. भ. बोरकर, विंदा करंदीकर, ग्रेस, मंगेश पाडगांवकर, शिरवाडकर इत्यादी कवींनी ललित निबंधामधून आपले विविधांगी व बहुढंगी जीवनानुभव ललितलेखनाद्वारे वाचकासमोर मांडले. श्रीनिवास विनायक कुलकर्णी, विजय तेंडूलकर, माधव आचवल, मारुती चितमपल्ली, आनंद यादव, अनिल अवचट् अशा अनेक लेखक-कवींनी मराठीतील ललित निबंध अधिकाधिक समृध्द केला.

गोवा मुक्तीनंतरच्या काळात ललितनिबंधाचा विचार करता प्रा. अ. का. प्रियोळकर 'प्रिय अप्रिय' (1965), गो. वि. वैद्य 'साखरझोप' (1966), गोपाळकृष्ण भोबे 'मासे आणि मी' (1968) असे ललितनिबंधसंग्रह प्रकाशित झाले.

मराठी साहित्यविश्वात फडके-खांडेकर-काणेकर यांच्यानंतर ललितनिबंध हा वाङ्मयप्रकार जोपासणारे व जिवंत ठेवणारे ललित निबंधकार म्हणजे बा. भ. बोरकर. 'कागदी होड्या' (1938) हा त्यांचा पहिला ललितनिबंध संग्रह. त्याच्यानंतर त्यांनी थेट 1982 मध्ये ललितनिबंध लिहिले ते म्हणजे 'चांदण्याचे कवडसे' (1982), 'पावलापुरता प्रकाश' (1983) व 'घुमटावरले पारवे' (1986) हे त्यांचे मुक्तीनंतरचे तीन ललितनिबंधसंग्रह आहेत. या निबंधामध्ये अनेकांची व्यक्तीचित्रे, आठवणी, गोमंतकीय लोकजीवन ते चित्रित करतात.

'मी' ला केंद्रवर्ती ठेवून या ललितनिबंधाची निर्मिती होत असते. माणसाचे जीवन हे त्यांच्यावर झालेले संस्कार, त्यांच्य अवतीभोवतीचे वातावरण, त्यातून निर्माण झालेले समज-गैरसमज, त्यांना भेटत गेलेली माणसे, सामाजिक व्यवहार या सगळयातून बनलेले त्यांचे मन जे कधी कठोर, कधी हळवे, कधी मृदु तर कधी संवेदनशील होत जाते. यातूनच त्याचे भावविश्व फुलते, बहरते तर कधी मोडते, कोसळते. ज्या प्रकारे त्याच्या भावविश्वाचा साचा बांधलेला असतो तसा तो जीवनाला घट्ट पकडून असतो. त्यातूनच त्याच्या चिंतनशीलतेला भक्कम पाठबळ मिळते. त्याच्य जीवनाचा तो एक अभिन्न भाग बनतो. असे भाग आपल्या जीवनापासून तो वेगळे काढून शकत नाही. ते आठवणीच्या, स्मृतीच्या रुपाने परत परत येत राहतात. आठवणींना उजाळा मिळत जातो. ह्याच स्मृती कधी-कधी तरल होऊन येतात तर कधी-कधी एखाद्या गहनगूढ चिंतनात हरवून जातात. बोरकरांचे चिंतनशील मन या ललित निबंधाद्वारे अधिकाधिक सुंदर रीतीने व्यक्त होताना दिसते.

प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा त्यांचा कल वेगवेगळा आहे. देवळाचा घुमट त्यांचा मनोघुमट होतो आणि त्याचा प्रत्यय त्यांना वारंवार येतो. त्यांच्या व्यक्तित्वाचे अनेक पारवे त्यावर घुमत असतात. प्रत्येकाचा स्वर निराळा, त्याचा आशय निराळा, त्याची लय निराळी, ते म्हणतात 'माझा अंतरात्मा विभुत्वाने त्या सगळयात वावरत असतो आणि आपले लिलालघव

प्रकट करीत असतो. त्याचे रुप व स्वरविभ्रम न्याहाळण्यात किती वेळ गेला हे माझ्या लक्षात येत नाही' असे हे मनाचे विविधरंगी पारवे आसमंतात मुक्तपणे विहार करताना दिसतात.

बोरकरांनी निसर्गावर तेवढ्याच तन्मयतेने प्रेम केले. 'देवासाठी असो की स्वतःसाठी असो फुले खुडण्यचा वसा सगळ्यानांच. येथे एकनाथांचा एक अभंग त्यांना आठवतो, की फुलझाडांनी आपली फुले फुलवून ईश्वराची पूजाच थाटलेली आहे. तेव्हा तिचा भंग करून मी फुल खुडू कसा, म्हणून त्यांना फुले झाडावरच सुंदर दिसतात. पानावरचे ऊन, मेरेवरून सरकत चालणारी गोगोलगाय, ब्रह्मकमळाचे उमलणे अशा निसर्गसृष्टीतून ते जीवनातील मर्म शोधू पाहतात. हा निसर्ग जीवंत होऊन त्यांच्या तनामनात अविरत राहतो. त्याच्याशी ते हितगुज करतात. त्यांची जीवनदृष्टी पिंडाच्या सौंदर्योपासकाची असल्याने ते निसर्गात रमतात. दैनदीन जीवनातील अनेक घटना-प्रसंगाच्या द्वारे फार मोठा गर्भितार्थ ते सांगून जातात. माणसाचा स्वभाव वृत्ती याकडे ते अतिशय बारकाईने लक्ष पुरवितात.

काकासाहेब कालेलकर, पु. ल. देशपांडे, चित्रकार दलाल यांच्यासह महात्मा गांधी, डॉ. लोहिया, पंडित नेहरू, योगी अरविंदबाबू या सारख्या विविध प्रांतातील थोर व्यक्तिमत्त्वांबरोबर त्यांचे स्नेहपूर्ण नाते होते. त्यामुळेच त्यांचे अनुभवविश्व व जीवन अधिक समृद्ध झाले याचा प्रत्यय ते आपल्या अनेक निबंधातून देतात.

त्यांच्या लेखनातून कोकणी माणसाचे मन जाणवते. लेखक त्यांच्या काळजाचा ठाव घेताना दिसतात. 'आनंदयात्री' अशी माणसे बोरकरांच्या व्यक्तिमत्वाचा भाग बनलेली दिसतात. उमद्या मनाने पाहणारी ही माणसे, दिसेल त्याचे उत्साहाने स्वागत करणारी माणसे, भेटेल त्याला भरभरून प्रेम देणारी माणसे त्यांच्या अवतीभोवती असायची. दुसऱ्यांना दिलेलेही अगत्याने घेणे तसेच दुसऱ्यालाही जमेल तसे देणे पण दिलेल्यांची नोंद मात्र कुठेही न ठेवणारी अशी माणसे आसपास वावरत असायची. बोरकरांच्या मते अशी माणसे सगळ्यांना हवीहवीशी वाटतात. त्यांच्या अवतीभवती गोळा होतात. जीव कानात आणून त्यांचे बोल ऐकत राहतात. कृष्णबाब नावाच्या एका सर्वसामान्य माणसाविषयी ते सांगतात 'संध्याकाळी कितीही थकून-भागून ते घरी आले, तरी त्यांच्या मुद्रेवरून उत्साह ओसंडत असायचा. हातातली पिशवी अननस, पपई, रायवळ, आंबा, करांदे, काटे-कणगी, रताळी अशी कोणत्या ना कोणत्या जिनसांनी भरलेली दिसायची. व्हरांड्यात बोरकरांचे वडील किंवा चुलते दिसले, की पिशवीतल्या जिनसांची ते तोंड भरून स्तुती करीत आणि ज्यानी तो दिला, त्याच्या चांगुलपणाचे गोडवे गात. हे पाहून बोरकरांना आश्चर्य वाटायचे. कृष्णबाबांना इतके मित्र कसे? आणि रोज असे नवे नवे जिन्नस लोक त्यांना देतात कसे? त्यांची रोज अशी चंगळ चाले असा मात्र याचा अर्थ नव्हे. कधी कधी साऱ्या कुटुंबाला रात्री पेजेवर गुजराण करावी लागे, पण त्याचा विषाद त्यांनी कधीच बाळगला नाही. 'राती किते खाल्ले? असे कोणी विचारले, तर नेहमीच्या आनंदी वृत्तीने कृष्णबाब म्हणत 'गंजीफ्राक'. गंजी म्हणजे पेज आणि फ्राक म्हणजे पातळ. या गंजीफ्राकची प्रशंसा करीत ते म्हणायचे 'उकड्या तांदळाची फुलार पेज आणि तोंडाक लावंक दोणातली आमली इंद्राच्या जिबेकपासून लाळ सुटतली.' कधी हेच कृष्णबाब कवळ्याला शांतादुर्गेच्या देवळात किंवा नवदुर्गेच्या देवळात जेवणावळी असल्या की मुलासह पायपीट करीत ते तिथे जात. घरच्या दारिद्र्यामुळे मुलांना गोडधोड खाऊ घालण्यासाठी कृष्णबाबाना अशा उपयांचा अवलंब

करावा लागे. अत्यंत गरीबीमध्ये हलाखीचे जीवन भोगणाऱ्या अशा या माणसामध्ये बोरकरांना आनंदाचे दर्शन झाले. जीवनाचे मर्म समजले. सारं जीवन हा एक आनंदमहोत्सव आहे आणि त्याची गंगोत्री आपल्याच अंतरात्म्यात आहे, याची साक्ष पटवणारा बोरकरांना भेटलेला हा पहिला आनंदयात्री होय.

गोव्यातील भूमीविषयी त्यांच्या भावना नेहमीच उच्च स्तरावरील राहिलेल्या दिसतात. गोव्याविषयी त्यांच्या मनामध्ये असणारी अतोनात ओढ अनेक ठिकाणी दिसते. ते म्हणतात 'माणसाची संस्कृती म्हणजे भास, भेस, भूस आणि भूंय. (भाषा, वेष, जेवण आणि भूमी). यामध्ये भूय ही अधिक महत्त्वाची आहे. गोव्याचे सौंदर्यहा त्यांच्य प्रतिभाशक्तीचा, जीवनानंदाचा एक अविभाज्य घटक आहे. गोवा सोडून ज्या ज्या वेळी त्यांना बाहेर जावं लागलं त्या त्या वेळी त्यांचं मन गोव्याच्या प्रेमाने, येथील निसर्गाने झूरत राहिले, ते म्हणतात, 'गोव्यातून बाहेर जाईपर्यंत जगाच्या भूगोलाविषयी एक भाबडा समज होता. जेथे जावे तेथे सृष्टी ही गोव्यासारखीच हिरवीगार आहे आणि माणसेही इथल्यासारखीच प्रेमळ आणि अगत्यशील आहेत. गोव्याबाहेर त्यांचा जो काळ गेला, त्याचा त्यांना एक फायदा झाला, की गोव्याचे सौंदर्य आणि थोरवी पाहण्याची एक नवी दृष्टी आपल्याला प्राप्त झाली असे ते म्हणतात. अंतर्यामी गोव्याच्या धुंदीत झुरणाऱ्या बोरकरांना गोव्यातली माड केव्हा दिसतात, असे व्हायचे. जुवारीचे पाणी तासनतास पाहत बसणे, गोव्यातल्या पावसाची मस्ती आणि धुंदी अनुभवणे यासाठी ते सतत झुरत राहिले. हा गोवेकर यशाच्या आणि कर्तुत्वाच्या इर्ष्येने गोव्याबाहेर दूर दूर जातो पण त्या यशात आणि वैभवातही गोव्यासाठी झूरतच राहतो हे विदारक सत्य ते सांगून जातात. त्यांसाठी ते काश्मीरमधल्या चिनार वृक्षाची उपमा देतात. या डेरेदार वृक्षाच्या सौंदर्याने मोहित होऊन नाना देशांच्या बादशहांनी त्याची रोपटी आपल्याकडे नेऊन लावली. त्यांची जीवापाड निगा घेतली; पण त्यांनी काश्मीरबाहेर कुठेही मूळ घेतलेच नाही. ती झूरत झूरत मेली. चिनारच्या झाडाला जशी स्वतःची भूमी लागते तशी ती सृजनशील माणसालाही लागते. तिच्यात त्याची मुळे जितकी खोलवर जातात, तितका तो आपल्या शाखा आकाशात अधिक दूरवर फाकू शकतो. आणि आपल्या खऱ्या ऐश्वर्याने बहरू शकतो. असा विचार ते प्रकट करतात.

आजच्या बदलत्या गोव्याबद्दल त्यांनी आपली खंत व्यक्त केलेली आहे. पुर्वी पिकविणे महत्त्वाचे होते, विकणे गौण होते. आज आपल्याकडून जे स्वभावतः पिकते, उगवते त्यात रस घेण्याऐवजी बाजारात मागणी कशाला आहे, हे पाहून जास्तीत जास्त चढ्या भावात कसे विकावे याच्याकडे आपला ओढा होऊ लागला आहे. आपला माल उत्कृष्ट असावा तो तसा आसण्यात आपली खरी पत आहे, ही धारणा क्षीण होत चालली आहे, यामुळे जून झालेला कलमी आंबा, कोवळे काजुगर, रसरसशीत ताजी मासळी, भरपूर आगळ दिलेले आमसूले आज दुर्मिळ होत चालली आहेत. मासळी बाजारात वा भाजी मार्केटमध्ये 'पुता', 'धुये' अशी पूर्वीची मायाळू भाषा आज ऐकायला मिळेनाशी झाली आहे. आता वैयक्तिक उद्योगाची जागा सामुदायिक औद्योगीकरण घेऊ पाहत आहे त्यामुळे आपली आर्थिक सुबत्ता वाढली हे खरे; पण त्याच्या मोबदल्यात समाजातला सलोखा आणि व्यक्तिमधील सृजनशील सुशेगादपणा आपण कायमचा गमावून बसू, की काय याची त्याना भीती वाटते. तसे झाल्यास गोमंतकीय अस्मितेच्या एका अत्यंत महत्त्वाच्या आणि मोलाच्या विशेषाला आपण पारखे होऊ असे ते म्हणतात. युरोप-अमेरिकेने आपला सुशेगादपणा टाकून दिला आणि औद्योगीकरणाची कास धरली. त्याने त्यांना विपुल सुबत्ता मिळवून दिली; पण त्याचबरोबर त्याने लोभ

आणि वेग हे दोन वाघ त्यांच्या मागे लावून दिले; त्यामुळे समाजातला सलोखा संपला. स्वास्थ मावळले. भोग लाभले, पण त्यांचा नीट आस्वाद घ्यायला लागणारी सवड हरपली. चित्ताचे स्वास्थ दुरावले. घराला घरपण उरले नाही. माणसे आपल्याच देशात आणि आपल्याच घरात परकी झाली. ती यंत्रवत झाली. कलह आणि युद्ध यांच्या धास्तीने  ग्रासली गेली. निर्मळ हवा, शुद्ध पाणी या साध्या गोष्टीही त्यांना दुर्मीळ होऊन बसल्या. त्याचमुळे आज युरोप-अमेरिकेतली तरुण मुले-मुली तिथली सुबत्ता टाकून देऊन स्वास्थ्यासाठी, सलोख्यासाठी आपल्या गोव्याच्या किनाऱ्यावर गर्दी करतात. अमेरिकन आणि युरोपियन जीवनाचा ध्यास घेतलेल्या गोमंतकीय लोकांनी आपल्या सुशेगादपणाचे मोल व महत्त्व वेळीच ओळखले पाहिजे नाहीतर त्या जीवनाला विटलेले लोक इथे गर्दी करू लागतील व कालांतराने ते गोमंतकीय बनतील आणि आम्ही मात्र ना इथले ना तिथले, असे त्रिशूंक बनू. असे गोमंतकाच्या भवितव्याविषयीचे आपले विचार त्यावेळी प्रकर्षाने मांडले.

बोरकरांनी मानवी जीवनमुल्ये अधिक जोपासली. आपल्या गत जीवनाकडे वळून पाहताना ते अधिक चिंतनशील झालेले दिसतात. गतस्मृतींचा पुनःप्रत्यय तर ते घेतातच पण त्या गतस्मृतींना वर्तमानजीवनाशी ते जोडू पाहतात. त्यावेळी आपल्या बदलत्या परिस्थितीकडे पाहता ते अधिक उदास व खिन्न होतात. कवितेमध्ये आढळणारी तृप्तता येथेही जाणवते.

***संकटाचा कोण केवा? दुःख खोटे दैन्य खोटे***
***मी तयाशी झुंजतांना भोगले ऐश्वर्य मोठे***

दुःखातही तृप्ती भोगणे हा काव्यतमनुभव त्यांच्या ललितलेखनातही वारंवार येतो. जीवनाचे ते भोक्ते आहेत तसेच ते भक्तदेखील आहेत. सौंदर्याचे ते उपासक आहेत. सत्य, मांगल्य व स्वातंत्र्य या मूल्यांवर त्यांची अपरंपार श्रद्धा आहे.

प्रत्येक गोष्ट अगदी तन्मयतेने न्याहाळून पाहणे हेच ललितनिबंधकाराची खासीयत असते. त्यांची सौंदर्योपासना शब्दजंजाळात गुरफटून राहिलेली नाही. जीवनातले भोग त्यांनी समदृष्टीने अनुभवले आहेत. तीव्र संवेदनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक विशेष आहे आणि म्हणून त्यांच्या साहित्याला विश्वात्मकता प्राप्त झाली आहे.

अनेकदा ते भूत वर्तमान ओलांडून भविष्याचा वेध घेतात. जीवनातल्या प्रत्येक क्षणांचा आनंद घेण्यास उत्सुक असणाऱ्या बोरकरांना अनेक गोष्टीसंबंधीचे दुःख जाणवते म्हणूनच ते श्रेष्ठ ठरतात. पोर्तुगीज राजवटीत ते वाढले असले तरी त्यांचा मूळ पिंड भारतीय होता. गोव्याच्या भूमीवर त्यांचे नितांत प्रेम होते. हलकीफुलकी प्रसन्न वाटणाऱ्या शैलीतून बोरकरांनी या निबंधाची रचना केली आहे. या ललितलेखनांतून शब्दवैभवानी नटलेले विस्तीर्ण मन दिसते. या ललितनिबंधाच्या आधारे बाकीबाबांच्या जुन्या आठवणींना पुरेपुर उजाळा मिळाल्याचे दिसते. यामध्ये कुठेही उसासणे, धपापणे नाही. संथ लयीत जीवनाचा एक आलेख ते मांडत जातात. जीवनाचे अनेक पदर ते उसवीत जातात. त्यांची जगण्याची व सृजनाची उर्मी जागृतच असलेले भासते. ते अगदी दीमाखाने भरभरून जीवनाचा आस्वाद घेताना दिसतात. बोरकर हे नेहमी आपल्याच तारेत मस्त राहणारे, त्यामुळे वयाचे भान त्यांनी कधीही ठेवले नाही. जे काही त्यांनी लिहिले आहे ते त्यांच्या मस्त वृत्तीतून दाटून आलेले मुक्तचिंतन आहे. स्नेहाने जो जवळ येतो त्याचेच ते बनून जातात याचा प्रत्यय अनेकदा या ललितनिबंधातून येतो.

◆ ◆ ◆